महा वितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# शिकाऊ उमेदवार भरती करीता जाहिरात

म.रा.वि.वि.कं. मर्या. जालना मंडळ अंतर्गत विभाग क्र. १ / २ जालना व चाचणी विभाग जालना करीता शिकाऊ तारतंत्री / वीजतंत्री (Electrician / Wireman Apprentice) एकूण १३३ पदांकरीता जाहिरात

अटी व शर्ती :

(१) जाहिरातीच्या तारखेस वय १८ वर्ष पुर्ण असावे वयोमर्यादा १८ ते २१ वर्षे (अ.जा. व अ.ज. करीता ५ वर्षे शिथिलक्षम). (२) सदर भरती ही फक्त जालना जिल्ह्यातील रहिवाशी असलेल्या उमेदवारांसाठी असून इतर जिल्ह्यातील उमेदवारांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. उमेदवार हा जालना जिल्ह्यातील रहिवासी असावा. (३) शैक्षणीक पात्रता – उमेदवार हा १० वी उत्तीर्ण असावा व महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त आय.टी.आय. वीजतंत्री / तारतंत्री उत्तीर्ण असावा (उमेदवार फेब्रुवारी २०१९ नंतर आय.टी.आय. विजतंत्री / तारतंत्री उत्तीर्ण झालेला असावा). (४) कागदपत्रे जमा करण्यापुर्वी www.apprenticeship.gov.in या संकेतस्थळावर ईच्छूक उमेदवाराने नोंदणी करणे आवश्यक आहे. (५) प्रशिक्षण कालावधी एक वर्षाकरीता राहील. (६) उमेदवाराने आपली शैक्षणीक कागदपत्रे (शाळा सोडल्याचा दाखल, १० वी उत्तीर्णचे प्रमाणपत्र / गुणपत्रक आय.टी.आय. च्या चारही सत्रांची गुणपत्रिका), अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate), जातीचे प्रमाणपत्र, आधारकार्ड, यांच्या साक्षांकीत छायांकीत प्रति दिनांक १८/०४/२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात जमा करावे. त्यानंतर सादर केलेले कागदपत्रे कोणत्याही सबबी खाली विचारात घेतले जाणार नाहीत. उमेदवाराने अर्ज व मुळ कागदपत्रे पडताळणीसाठी दिनांक २०/०४/२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता अधीक्षक अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्या. जालना मंडळ कार्यालय येथे हजर रहावे. (७) प्रशिक्षण संपल्यानंतर शिकाऊ उमेदवारांना कंपनीच्या सेवेत सामावून घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी. (८) जाहिरातीत बदल करण्याचे किंवा संपूर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार हे कंपनी राखून ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही. (९) शिकाऊ उमेदवार निवड प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने कोणत्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास उमेदवारी रद्द करण्याचे येईल. (१०) भरती प्रक्रियेचे स्वरुप ठरविण्याचे संपुर्ण अधिकार व्यवस्थापनाने राखुन ठेवले आहेत.

अधीक्षक अभियंता,
म.रा.वि.वि.कं. मर्या. जालना मंडळ

PRO No. 205